## <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

महापालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3 रा मजला, बेलापूर, नवी मुंबई - 400 614.

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-** दिनांक 08 जून 2016.

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>जून महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक 17 जून 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** इतिवृत्त कायम करणे.

**2.** प्रश्नोत्तरे.

**3.** ठाणे-बेलापूर रस्ता रुंदीकरणात बांधीत होणाऱ्या झोपडयांचे दिघा येथील OS-01 भुखंडातील AM-5 या भुखंडावर पुनर्वसन करणे.

**4.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विविध संवर्गाच्या पदनिर्मिती करणे.

**5.** सी.बी.डी. बेलापूर से. 6 येथे रिक्शा स्टँड जवळ आर.सी.सी. बॉक्स ड्रेन बांधणे.

**6.** सी.बी.डी. से.5 येथील गुरु गोविंद सिंग मार्ग पर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती व सुधारणा करणे.

**7.** बेलापूर विभागातील सेक्टर 19/20 मधील अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे.

**8.** बेलापूर विभागातील नेरूळ से.50 येथील भु.क्र. 63 ते 89 आणि 123 ते 134 पर्यंतच्या रस्त्याची सुधारणा करणे व रिटेनिंग वॉल बांधणे.

**9.** बेलापूर विभागातील नेरुळ येथिल टी.एस.चाणक्य सिग्नल ते भु.क्र.,7 से.58 दरम्यान सव्हिस रस्ता बांधणे.

**10.**बेलापूर विभागातील से. 30 आग्रोळी गा. वि. यो. अंतर्गत रस्ते, गटर व पदपथ बांधणे.

**11.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत सन 2013-14 आर्थिक वर्षासाठी अतिरिक्त प्राप्त अनुदानातुन कामे करणे.

**12.** नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उदयानांच्या सर्वसमावेशक कंत्राटाबाबत. (performance based - comprehensive contract).

**13. ॲड सौ. □ पर्णा नविन गवते, यांजकडून :-**
**"महिला व बालकल्याण समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**14. श्रीम. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-**
**"आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**15. श्री. □ शोक बाबूराव गुरखे, यांजकडून :-**
**"पाणीपुरवठा व मलनि:स्सारण समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**16. श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून :-**
**"क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**17. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील :-**
**"समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**18. ॲड सौ. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-**
**"विधि समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**19. श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**
**"विद्यार्थी व युवक कल्याण समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**20. श्रीम. स्वप्ना □ शोक गावडे, यांजकडून :-**
**"उद्यान व शहर सुशोभिकरण समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**21. श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**
प्र.क्र.55 सेक्टर 11 च्या नाल्याची पिचींग पॉईनटींग करणे.

**22. डॉ. जयाजी के. नाथ यांजकडून :-**
प्र.क्र.104 मधील सेक्टर 4 (बीटेन-1 ते 15) अल्प उत्पन्न गटातील लोकांच्या घराच्या आजुबाजूस इंटर लॉक लावण्यात यावेत. जेणेकरुन त्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य व पावसाळयामध्ये दलदल निर्माण होणार नाही.

**23 ते 25. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**
**(23)** प्र.क्र.12, सेक्टर 2 मधील एल.आय.जी. ग्रुप ची घरे आहेत. ए-ग्रुप, बी-ग्रुप, सी-ग्रुप, इ-ग्रुप तसेच ममता सोसायटी, प्रितम सोसायटी, विशाल सोसायटी, प्रिती सोसायटी, हर्षा सोसायटी, दिपा सोसायटी औदुंबर सोसायटी इ. येथील ड्रेनेज सिस्टीम ही सिडको कालीन असुन सद्य

स्थितीत ड्रेनेज सिस्टीम ची दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तरी सेक्टर 2 मधील ड्रेनेज सिस्टीम नव्याने करणे. **(24)** प्र.क्र.12, सेक्टर 2 मधील ओव्हरहेड वायर चे 30% काम अद्यावत इ-ग्रुप, बी-ग्रुप, सी-ग्रुप मध्ये झालेले नाही. त्या ठिकाणी ओव्हरहेड वायर वारंवार तुटून अपघात होत असतात. तरी उर्वरित राहिलेल्या 30% ओव्हरहेड वायर काढून अंडरग्राऊंड करणे. **(25)** प्र.क्र.12, सेक्टर 2 मधील जनता मार्केट लगत तसेच तक्षशीला बुध्द विहारा लगत उत्तम दर्जाचे हायमास्ट लावणे.

**26 ते 28. सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**

**(26)** प्र.क्र.47, मधील कै. आण्णासाहेब पाटील उद्यान सुशोभिकरण करणे. **(27)** प्र.क्र.47, मधील सिव्हरेज लाईन (मलनि:सारण वाहिन्या) बदलणे. **(28)** प्र.क्र.47, मधील कै. आण्णासाहेब पाटील उद्यानात बहुउद्देशीय इमारत बांधणे.

**29 ते 31. सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून:-**

**(29)** प्र.क्र.83, जुईनगर मधील मराठी शाळा क्र. 17 च्या वर एक मजला बांधुन पुढे नववी व दहावीचे वर्ग भरविणे. **(30)** प्र.क्र.83, जुईनगर येथे बांधत असलेल्या बहुउद्देशीय इमारतीवर एकच मजला बांधण्यात येत आहे त्यामुळे एकाच दिवशी जनतेला जागे अभावी निरनिराळे कार्यक्रम साजरे करताना अडचणी येतील म्हणून त्यावर अजून दोन मजले बांधण्याची परवानगी देणे. **(31)** प्र. क्र. 83, जुईनगर येथे निरनिराळया ठिकाणी वाचनालयाच्या चार शेड बांधाव्यात जेणे करुन जेष्ठ नागरिकांना त्याचा लाभ होईल.

**32 ते 34. सौ. निर्मला आनंदराव कचरे :-**

**(32)** प्र.क्र.52, मधील प्लॉट क्र. 22 हा प्लॉट हॉस्पिटलसाठी आरक्षित आहे. त्या ठिकाणी नागरी सुविधा केंद्र किंवा हॉस्पिटल बनविण्यात यावे कारण बोनकोडे गाव व महापे या ठिकाणी नागरी सुविधा केंद्र आहे ते येथील रहिवाशांना खुप दुर पडत असल्यामुळे नागरिकांची खुप गैरसोय होते. **(33)** प्र. क्र. 52, सेक्टर 14 क्रांतीसिह नाना पाटील गार्डन मध्ये लॉन व झाडे तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी बसवून मिळविणे. **(34)** प्र.क्र.52, सेक्टर 14 क्रांतीसिंह नाना पाटील हे 5000 स्क्वे. मिटरचे गार्डन आहे. त्यामध्ये पाणी पुरवठा खुप अत्यल्प प्रमाणात होतो तेव्हा एस.टी.पी. मधून गार्डन ते एस.टी.पी. पाईपलाईन करुन मिळावी.

**35 ते 37. सौ. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-**

**(35)** प्र.क्र.94, सेक्टर 10, नेरुळ येथील ह.भ.प. कोंडाजी बाबा डेरे मार्गावरील राजकमल मार्केटच्या शेजारी असलेल्या पदपथांच्या मोकळया जागेवर प्रभागातील समस्त नागरिकांच्या व जेष्ठ नागरिकांच्या सुविधेसाठी विश्रांती कट्टा व वाचनालय शेडसह बांधणे. **(36)** प्र.क्र.94, सेक्टर 10, नेरुळ येथील ह.भ.प. कोंडाजी बाबा डेरे मार्गावरील व साईबाबा हॉटेल ते स्टेशन रोड या दोन्ही मुख्य रस्त्यालगत असलेल्या गृहनिर्माण सोसायटयांच्या मुख्य गेट बाहेरील पदपथांवरील मोकळया जागेत नागरिकांच्या व विशेषत: महिला आणि जेष्ठ नागरिक यांना विश्रांती व बसण्याची सुविधा देता यावी यासाठी महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणी बेंचेस (बाके) बसविणे. **(37)** प्र.क्र.94, सेक्टर 10, नेरुळ येथील ह.भ.प. कोंडाजी बाबा डेरे मार्गावरील व साईबाबा हॉटेल ते स्टेशन रोड या दोन्ही मुख्य रस्त्यांलगत असलेल्या पदपथांची अवस्था ही काही ठिकाणी बिकट असुन अनेक जागी पेव्हर ब्लॉक निघालेले आहेत तसेच दोन्ही मार्गावरील पदपथांचे कर्बस्टोन, रस्त्यालगतच्या पदपथांची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे.

**38 व 39. श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**

**(38)** प्र.क्र.26, महापे मधील अडवली-भुतावली गावात अदिवासी, मागासवर्गीय व गरिब विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बनविण्यात यावे. त्यामुळे नवी मुंबई मध्ये शिक्षण घेण्यास येणाऱ्या गरीब आदिवासी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येईल. **(39)** प्र.क्र.26, महापे येथील मिलिनियम बिझनेस पार्कच्या गेट समोर बस स्टॉपजवळ हाय मास्ट लावणे.

**40 व 41. श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून :-**

**(40)** प्र.क्र.43, सेक्टर 18 मधील सर्व अंतर्गत गटारांची पावसाळी पुर्व साफ सफाई करणे. **(41)** प्र.क्र.43, सेक्टर 17 मधील सर्व अंतर्गत गटारांची पावसाळी पुर्व साफ सफाई करणे.

**42 ते 44. सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**

**(42)** प्र.क्र.96, सेक्टर 16, नेरुळ येथील सागरदर्शन सोसायटी ते अष्टविनायक सोसायटी पर्यंत मोठी मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. **(43)** प्र.क्र.96, सेक्टर 16, नेरुळ येथे सुसज्य व्यायामशाळा बांधणे. **(44)** प्र.क्र.96, सेक्टर 18 व 16 नेरुळ मधील सागरदर्शन टॉवर व सी ब्रीज टॉवर पाठीमागील सर्विस रोडला गटार बांधणे.

**45 ते 47. सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून:-**

**(45)** प्र.क्र.45, मध्ये सेक्टर 6 मधील "रोहित मसाला" समोर "जेष्ठ नागरिक" निवारा शेड बांधणे.

**(46)** प्र.क्र.45, मध्ये सेक्टर 3 मधील "सामना मित्र मंडळा" समोर "जेष्ठ नागरिक" निवारा शेड  व वाचनालय बांधणे. **(47)** प्र.क्र.45, सेक्टर 3 मधील "नियोजीत" मोकळया भुखंडावर बहुउददेशीय इमारत बांधणे.

**48 व 49. श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :-**

**(48)** प्र.क्र.89, शिरवणे गांवामध्ये उर्वरीत भागामध्ये जुन्या मलनि:स्सारण वाहिन्या  काढून नवीन वाहिन्या टाकणे. **(49)** प्र.क्र.89, शिरवणे गांव येथील डी.पी.बॉक्स शेजारी असलेल्या विद्युत वाहिन्या उघडया आहेत तरी सदर विद्युत वाहिन्या भुमिगत करणे.

**50 ते 52. सौ. सुरेखा □शोक नरबागे, यांजकडून :-**

**(50)** प्र.क्र.103, सीबीडी, सेक्टर 8 आर्टिस व्हिलेज मध्ये असलेल्या मध्यवर्ती नाल्याची दुरुस्ती व रंगरंगोटी पावसाळयापुर्वी करणे. **(51)** प्र.क्र.103, सीबीडी, सेक्टर 8ब मध्ये आरोग्य विभागासाठी राखीव केलेल्या भुखंडामध्ये इमारत बांधणे. **(52)** प्र.क्र.103, सीबीडी, सेक्टर 8 व 8 ब आर्टिस व्हिलेज मध्ये पाण्याचे बिल व पाणी वाचवण्यासाठी (Rain Harvest) राबविण्यासाठी योग्य ठिकाण निवडणे.

**53 ते 55. श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**

**(53)** प्र.क्र.108, सीवुडस□येथील सुरु असलेल्या शाळेच्या इमारतीमध्ये एक मजला वाढवून त्या ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालय आणि लायब्ररी सुरु करणे. **(54)** प्र.क्र.108, सीवुडस येथील गणेश मद्दानात खुले सभागृह बनविणे. **(55)** प्र.क्र.108, येथील मोकळया भुखंडावर महिला बचत गटांसाठी खरेदी विक्री स्टॉल उभारणे.

**56. श्रीम. सिमा गायकवाड, यांजकडून :-**

प्र.क्र.31, घणसोली मध्ये गटर, पदपथ, रस्ते नव्याने दुरुस्ती करणे.

**57 व 58. श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-**

**(57)** प्र.क्र.92, नेरुळ सेक्टर 21 येथील आर.सी.सी. गटारे ही सिडको कालीन  असल्याने नादुरुस्त झालेली आहेत. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा बरोबर होत नाही, परिणामी अनेक ठिकाणी पाणी साठले जाते. म्हणून नेरुळ सेक्टर 21 येथील अंतर्गत गटारे बांधणे. **(58)** प्र.क्र.92, नेरुळ, दारावे येथील अंतर्गत मलनि:स्सारण वाहिन्या हया कमी व्यासाच्या असुन नादुरुस्त झालेल्या आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा बरोबर होत नसल्याने सांडपाणी चेंबरमधून बाहेर येत आहे. परिणामी नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी दारावे येथील अंतर्गत मलनि:स्सारण वाहिन्या मोठया व्यासाच्या टाकणे.

**59 ते 61. श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-**

**(59)** प्र.क्र.27, अंतर्गत घणसोलीगावाच्या सुरुवातीला अर्जूनवाडी जवळ असलेल्या नाल्याची पावसाळयापुर्वी साफसफाई करणे. **(60)** प्र.क्र.27, अर्जूनवाडी जवळ असलेल्या नाल्यावर एम.एस.सी.बी. चा ट्रान्सफार्मर भोवती सुरक्षा भिंत बांधणे. **(61)** प्र.क्र.27, अंतर्गत पावसाळयापुर्वी एम.एस.सी.बी. दिवे बदलून एल. इ. डी. दिवे लावणे.

**62 व 63. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

**(62)** प्र.क्र.28, अंतर्गत सर्व स्ट्रीट लाईट बदलून तेथे नवीन एल. ई. डी. दिवे लावण्यात यावेत व जुने आणि खराब झालेले डि. पी. बॉक्स बदलून नवीन बॉक्स लावणे. **(63)** प्र.क्र.28, अंतर्गत पावसाळयापुर्वी सर्व कामे करण्यात यावीत, उदा तलाव,  विहीरी, नाले, गटार यांची सफाई करणे.

**64 व 65. श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**

**(64)** प्र.क्र.95, मधील  सतनाम निवास ते बांचोली मद्दानापर्यंत गटार व पदपथांची सुधारणा करणे. **(65)** प्र.क्र.95, मधील गोपीनाथ पाटील ते दामोदर म्हात्रे यांच्या घरा समोरील गटाराची सुधारणा करणे.

**66 ते 68. सौ. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**

**(66)** प्र.क्र.64, अंतर्गत सर्व सार्वजनिक ठिकाणी उदा. उद्यान, मार्केट, मद्दान, ट्रि बेल्ट येथे लिटर बिन बसविणे. **(67)** प्र.क्र.64, अंतर्गत सेक्टर 7 जनता मार्केट येथील पावसाळी गटार मोडकळीस आलेले आहे त्यामुळे येथील पाणी जमा होऊन नागरिकांना पावसाळयात पाण्यामधून ये-जा करावे लागते. तरी सेक्टर 7 जनता मार्केट येथील गटारे नव्याने बांधणे. **(68)** प्र.क्र.64, वाशी सेक्टर 1ए, वाशी पोलिस स्टेशन ते मंगलमुर्ती ए टाईप अपार्टमेन्ट पर्यत गटाराची दुरवास्था झालेली आहे व बऱ्याच ठिकाणी गटारे मोडकळीस आलेली आहेत व चेम्बर तोडलेले आहे. तरी हे गटार नव्याने बांधणे.

**69 ते 71. श्री. □शोक बा. गुरखे, यांजकडून :-**

**(69)** प्र.क्र.102, बेलापूर येथील सेक्टर 1 व 9 मध्ये निवारा शेड बांधणे. **(70)** प्र.क्र.102, बेलापूर येथील सेक्टर 1 आण्णाभाऊ साठे उद्यान ते सेक्टर 9 येथील  लेन क्र. 1 पर्यंत जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुच्या भिंतीची दुरुस्ती व सुधारणा करणे. **(71)** प्र.क्र.102, बेलापूर मध्ये सेक्टर 3 येथील H.T. लाईन खालील उद्यानांची दुरुस्ती व सुधारणा करणे.

| | |
|---|---|
| **72 व 73. सौ. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-**<br>**(72)** प्र.क्र.106, अंतर्गत बेलापूर, शहाबाज, फणसपाडा मधील असलेल्या फणसपाडा गावच्या पुर्वेला उघडया नाल्यावंर सिमेंट काँक्रिट स्लॅब तो नाला बंदिस्त करावा. या उघडया नाल्यामुळे फणसपाडा गावाच्या नागरिकांना कमालीचा दुर्गधीचा त्रास सोसावा लागत आहे. तसेच या उघडया नाल्यामुळे डासांचे प्रमाण वाढल्याने अनेक नागरिक वृध्द, महिला, लहान मुले, मलेरिया, डेंग्यु, हिवतापाने आजारी पडतात. तरी नागरीकांना रोगराईपासून दिलासा मिळावा यासाठी सदरचा नाला बंदिस्त करणे. | **(73)** प्र.क्र.106, अंतर्गत बेलापूर, शहाबाज, फणसपाडा येथे असलेल्या फणसपाडा गावच्या गावदेवी मंदिराच्या समोर असलेल्या मोकळया मद्यानात (OPEN) सिमेंट काँक्रीट किंवा पत्र्याचे निवारा शेड उभारावे, जेणेकरुन ग्रामस्थांना उन्हाळयात व पावसाळयात या निवारा शेडचा लाभ घेता येईल. या शिवाय येथे असलेल्या (चौथा-यावर) सभा मंडपाच्या ठिकाणी लग्नकार्य व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीही शेड उभारावे. त्यामुळे या भागातील नागरिकांना त्यांचा लाभ होईल. |

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक : 08 जून 2016.**